लोकमत

# क. का. वाघतर्फे ६ सप्टेंबरला शाडूमाती गणेशमूर्ती कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक :** क. का. वाघ शिक्षण संस्था व संलग्न संस्थांच्या संयुक्त विद्यमाने ६ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजता के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या कॅम्पसवर इको फ्रेंडली गणेश अर्थात शाडूमाती गणेशमूर्ती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

इयत्ता पहिली ते दहावी तसेच कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना के. के. वाघ फाइन आर्ट्स महाविद्यालयातील तज्ज्ञ मूर्तिकारांकडून शाडू मातीपासून गणेशमूर्ती तयार करण्याचे मार्गदर्शन मिळणार आहे. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी दरवर्षी या कार्यशाळेचे आयोजन केले जाते. नाशिक शहरातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन नावनोंदणी करावी, असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

Nashik Main
Page No. 2 Aug 31, 2026
Powered by: erelego.com